पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०२

**सभावृत्तांत**

दिनांक - १६/०८/२०१९ वेळ - दुपारी २.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१६/०८/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.कदम शशिकांत गणपत
५. मा.वैशाली जालिंदर काळभोर
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) शालेय वेळेत बदल करणेबाबत – मा.रेखा दर्शले, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड मनपा प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पी.टी. गणवेश व शालेय स्वेटर साहित्य उपलब्ध करुन देणेबाबत - मा.रेखा दर्शले, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

----------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.सुलक्षणा धर अनुमोदक - मा.वैशाली काळभोर

भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री व भाजपाच्या जेष्ठ नेत्या सुषमा स्वराज यांचे नुकतेच निधन झालेले असलेने तसेच सांगली जिल्हयामध्ये पुराच्या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींना आजच्या सभेत त्यांना श्रध्दांजली वाहून सभा गुरुवार दिनांक २९/०८/२०१९ रोजी दुपारी २.१५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**सभापती** - गुरुवार दिनांक २९/०८/२०१९ रोजी दुपारी २.१५ वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०२

**सभावृत्तांत**

( दिनांक १६/०८/२०१९ ची तहकूब सभा )

दिनांक - २९/०८/२०१९ वेळ - दुपारी ०२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक **१६/०८/२०१९** (दु.**२.००** वा.) ची तहकूब सभा (**कार्यपत्रिका क्रमांक ०२**) गुरुवार दिनांक **२९/०८/२०१९** रोजी दुपारी **०२.१५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.सागर बाळासाहेब गवळी
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.कदम शशिकांत गणपत
६. मा.वैशाली जालिंदर काळभोर
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
९. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), मा.पुजारी, मा.पाटील, मा.गट्टूवार – कार्यकारी अभियंता, मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.भाऊसाहेब भोईर अनुमोदक – मा.सागर गवळी

भारताचे माजी अर्थमंत्री व भाजपाचे जेष्ठ नेते अरुण जेटली यांचे नुकतेच दु:खद निधन झालेले असलेने आजचे सभेत त्यांना श्रध्दांजली अर्पण करुन सभा शुक्रवार दि.३०/०८/२०१९ रोजी स.११.४५ वा. पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**सभापती -** शुक्रवार दि.३०/०८/२०१९ रोजी स.११.४५ वा. पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०२

**सभावृत्तांत**

( दिनांक १६/०८/२०१९ (दु.२.०० वा.) व २९/०८/२०१९ (दु.२.१५ वा.) ची तहकूब सभा )

दिनांक - ३०/०८/२०१९ वेळ - सकाळी ११.४५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक **२९/०८/२०१९ (दु.२.१५)** वा.ची तहकूब सभा (**कार्यपत्रिका क्रमांक ०२**) शुक्रवार दिनांक **३०/०८/२०१९** रोजी सकाळी **११.४५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.गायकवाड निर्मला मनोज
४. मा.वैशाली जालिंदर काळभोर
५. मा.सुलक्षणा राजू धर
६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
७. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

दिनांक ०९/०८/२०१९ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ०१) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०२ विषय क्रमांक – ०१
दिनांक - ३०/०८/२०१९
सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.चंदा लोखंडे
संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

पिंपळे निलख मुले प्राथमिक शाळा क्र.२५ या शाळेची सध्याची वेळ सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.३० याप्रमाणे आहे. स्थानिक मा.नगरसदस्य यांनी सदर शाळा सकाळी ८.०० ते दुपारी २.०० या वेळेत भरविणेकामी सुचित केले आहे. त्यांनी केलेल्या मागणीनुसार शालेय वेळेत बदल करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच कुदळवाडी प्राथमिक शाळा वर्ग खोल्या अपुर्ण असल्याने सध्या दोन सत्रात भरत आहे. तथापि शाळेसाठी नविन इमारत तयार झाली असल्याने वर्ग खोल्यांची पूर्तता झाली असून सदर शाळा भरविण्याची वेळ सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.३० या प्रमाणे भरविण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच चिखली प्राथमिक शाळा मुले/मुली या दोन शाळा सध्या दोन सत्रात भरविल्या जात आहेत. सध्या शाळेसाठी नव्याने इमारत उपलब्ध करुन देण्यात आली असून सदर दोन्ही शाळा एका सत्रात सकाळी ११.३० ते सायंकाळी ५.३० याप्रमाणे

भरविण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०३ विषय क्रमांक – ०२

दिनांक - ३०/०८/२०१९

सुचक : मा.रेखा दर्शले अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ :- मा.रेखा दर्शले, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागाच्या शाळांमध्ये शिकणारे असंख्य विद्यार्थी हे गोर-गरीब, कष्टकरी कामगार वर्गातील असून त्यांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. या वर्षी पिंपरी चिंचवड मनपा शहर परिसरात मोठी पर्जन्यवृष्टी झाल्याने शहरात पुरजन्य परिस्थिती निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या घरामध्ये, वस्तीमध्ये, झोपडपट्टीमध्ये मोठया प्रमाणात पाणी शिरल्याने विद्यार्थ्यांना वाटप केलेले शालेय गणवेश, पी.टी.गणवेश व शालेय स्वेटर या साहित्याचे नुकसान झाले आहे. तसेच काही ठिकाणी सदरचे साहित्य पाण्याबरोबर वाहूनही गेले आहे. तरी शालेय गणवेश, पी.टी.गणवेश व शालेय स्वेटर या साहित्यापासून एकही विद्यार्थी वंचित राहू नये, त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, म्हणून शालेय गणवेश, पी.टी.गणवेश व शालेय स्वेटर साहित्य पुरवठा करणा-या पुरवठाधारकामार्फत सदर साहित्याचे शहरातील सर्व पिं.चिं.मनपा प्राथमिक शाळेतील पुर बाधीत विद्यार्थ्यांना त्वरित वाटप करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३९६/२०१९
दिनांक : ३०/०८/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.